समरी क्रि.केस नंबर २६३/२०१७ निशाणी २५ लगत

फिर्यादीतर्फे साक्षीदार नंबर -०१ संजय शिवाजी जगताप.

शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री लाड यांच्याकडुन

२- माझे शिक्षण इयत्ता दहावी पास इतके आहे. माझे दहावीचे शिक्षण देशिंग येथे झालेले आहे. माझे गाव बनेवाडी असुन आरोपीचे गाव शिंदेवाडी-आरग असुन त्यामध्ये अंदाजे ६० कि.मी. अंतर आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी आमचे पाहुणे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की मी माझ्या फिर्यादमध्ये आरोपी हे माझे पाहुणे असल्याबाबतचा उल्लेख केलेला नाही. माझ्या घरी माझी पत्नी व आई असे राहतो. मुलगा नोकरीसाठी बाहेरगावी असतो व मुलीचे लग्न झालेले आहे.

३. आरोपी विशाल याचे वय अंदाजे २० वर्षे आहे. माझा मुलगा सौदी अरेबिया येथे कामास आहे. आरोपीने रक्कम घेतांना शेती आहे असे सांगितले होते व ती मी पाहिली होती त्याचप्रमाणे तो व्यवसाय करणार आहे, असे सांगितले होते. आरोपीने पैसे घेतांना शेती व व्यवसाय करणार असल्याचे सांगितले होते. सद्य स्थितीत तो काय करतो, हे मला माहित नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की माझ्या मुलाची आर्मीत जायची इच्छा होती व त्यासाठी त्याने प्रयत्न केले होते. हे म्हणणे खरे नाही की शारिरिक चाचणीत तो अनुतीर्ण व्हायचा. हे म्हणणे खरे नाही की माझ्या मुलाचे आर्मीमधील भरतीचे वय संपत चालल्यामुळे मी एजंट शोधला. हे म्हणणे खरे नाही की माझा मुलगा शुभव व आरोपी नंबर २ विशाल हे नाशिक येथील अश्वीन आगमकर यास भेटले. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी एजंटने प्रत्येकी ५०,०००/- रुपये द्यावे लागतील असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की मी रक्कम देण्यास तयार झालो व त्यावेळी आरोपी नंबर २ याने त्याच्याकडे पैसे नसल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की आरोपी नंबर २ याचे पैसे मी भरण्यास तयार झालो. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी मी आरोपी नंबर २ कडुन सुरक्षिततेसाठी वादातीत नि.क्र.४२ वरील धनादेश व नि.क्र.४३ व ४४ वरील उसनवार पावत्या लिहुन घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की सदर व्यवहारावेळी आरोपी नंबर २ चे मामा पांडुरंग यशवंत कोकळे, राहणार शिंदेवाडी हे उपस्थित होते. हे म्हणणे खरे नाही

की आरोपीने शेतीसाठी व व्यवसायासाठी माझ्याकडुन रक्कम रुपये २,५०,०००/- घेतलेले नव्हते. तथाकथीत रक्कम आरोपी नंबर २ यास देतेवेळी त्याच्यासोबत त्याचे मित्र होते. आरोपी नंबर २ चे वडील कधी मयत झाले याबाबत मला कल्पना नाही. उसनवार पावतीवर साक्षीदाराची स्वाक्षरी घेण्याची गरज मला वाटली नाही.

५. मी आयकर भरत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीतर्फे हरि साळुंखे राहणार - आरग यांच्याकडुन रक्कम रुपये ३०,०००/- धनादेश मला देण्यात आलेला होता. हे म्हणणे खरे नाही की सदर धनादेश देतांना पांडुरंग कोकळे हे हजर होते. मला हरी साळुंखेकडुन कोणताही धनादेश प्राप्त झालेला नाही. रक्कम रुपये ५०,००० देतांना आरोपीकडुन उसनवार पावती लिहुन घेण्यास मला कोणतीच अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की तात्यासाहेब पांडुरंग जगताप हे माझ्या भावकीतील व गावातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की एकमेकाच्या अडचणींना आम्ही धावुन जातो.

६. हे म्हणणे खरे नाही की आरोपी नंबर २ हा केवळ ५०,०००/- रुपये देणे लागत होता व त्यापैकी ३०,००० रुपये त्याने दिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की आरोपी नंबर २ हा माझा कधीही मित्र व नातेवाईक नव्हता. हे म्हणणे खरे नाही की आरोपी नंबर १ व २ हे आमचे पाहुणे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की आरोपी नंबर १ धोंडुताई हिच्याबरोबर कोणताही व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादमध्ये नमुद केलेली रक्कम फिर्यादमध्ये नमुद केलेल्या कारणासाठी आरोपीस कधीही दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की को-या धनादेशावर व उसनवार पावत्यावर आरोपीच्या सुरक्षिततेसाठी घेतलेल्या स्वाक्षरांच्या आधारे त्यांचा गैरवापर करुन आरोपीविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटा जबाब देत आहे. उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृती

कवठेमहांकाळ
दिनांक ०७.११.२०१९

(श्रीनिवास अ.कुलकर्णी)
प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, कवठेमहांकाळ.